स्थायी समितीच्या **शनिवार** दिनांक 30–07–2011 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |
| 8. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 9. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 10. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 11. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 12. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 13. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 14. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 15. | डॉ. मिलींद माने | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 16. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. विष्णुपद बुटे, अपर आयुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

(दिनांक 29.06.2010)

<u>ठराव क्रमांक 52</u> :– ठराव क्रमांक 282 दि. 18.11.2008 प्रमाणे नगर रचना विभागात असलेल्या ऑटो.डी.सी.आर. प्रणाली सेवा करीता चे निर्धारीत दर रु. 10/– प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र+सेवा कर मध्ये प्रति वर्ष देण्यात येणारी 5% प्रस्तावित दर वाढ न सुचविता या वर्षाकरीता मुळ दराप्रमाणे म्हणजेच वर्ष 2008–09 मधे मंजुर दर कायम ठेवण्याबाबत तसेच या प्रणालीला मा. आयुक्त यांनी दि. 11.05.2010 पर्यंत स्थायी समितीची मंजुरी मिळेल या पुर्व धारणेवर प्रशासकीय गैरसोय होणार नाही या कारणास्तव मंजुरी प्रदान केली. करीता उपरोक्त प्रस्तावास एक वर्षा करीता मुदत वाढ व वरील प्रमाणे मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन

1. नागपूर महानगर पालिकेतील नगररचना विभागातील तसेच क्षेत्रीय कार्यालयातील इमारत नियत्रंण व रेखाचित्र मंजूरीचे जे स्था. अभि.सहा., कनिष्ठ अभियंता व उप अभियंता कार्य करतात अश्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना निविदा काराबरोबर करारनाम्यातील अट क्र. 6 प्रमाणे प्रशिक्षीत करणे निविदाकारास बंधन कारक होते. परंतु ते झाले नसल्यामुळे कमीतकमी 30 अधिकारी व कर्मचाऱ्यास दि. 31.10.2011 पर्यंत निविदाकाराने प्रशिक्षीत करावे व प्रशासने ते करुन घ्यावे.
2. संबंधीत सर्व अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षीत झाल्यावर या ऑटो डी.सी.आर. पध्दतीची अंमलबजावणी म.न.पा. द्वारे स्वतःचे हार्डवेअर व सॉफ्टवेअर खरेदी करण्याची निविदा प्रक्रीया सुरु करावी व यासाठी म.न.पा. सभागृहाची व सक्षम प्राधिकारणीची रितसर परवानगी घ्यावी. मंजुरी प्राप्त झाल्यावर निविदा प्रक्रीया सुरु करावी.
3. ऑटो डी.सी.आर. बाबत दिलेल्या चौकशी समितीचा अहवाल व दि. 21 जुलै 2011 रोजी घेतलेल्या विभागाच्या सर्व अधिकारी, शहरातील नामवंत वास्तुशास्त्रज्ञ, परवाना धारक अभियंते, नाग विदर्भ बिल्डर्स, असोसीयशन, इंडीयन इन्स्टीटयुट ऑफ आर्कीटेक्ट, इंडीयन इंन्स्टीटयुट ऑफ, टाऊन प्लानर असोसीयशन यांनी या ऑटो डी.सी.आर. प्रणालीतील दोष व त्रुटया बद्दल व त्याची निविदाकार योग्य रित्या अंमलबजावणी करीत नसल्याच्या तक्रारी केल्या, त्याची अत्यंत गंभीर दखल स्थायी समिती ने घेतली.

म्हणुन ही स्थायी समिती चौकशी उपसमितीने दिलेल्या निष्कर्ष व शिफारसी 'अ' व 'ब' लक्षात घेता हा संपूर्ण कंत्राट अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर दि. 01.11.2011 नंतर रद्द करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

# ऑटो डी. सी. आर. बाबत
# चौकशी उपसमितीचा अहवाल

प्रस्तावना :—

स्थायी समिती ठराव क्र. 80 दिनांक 21/08/2009 स्थायी समिती सदस्यांनी व्यक्त केलेल्या चर्चेचा मानस लक्षात घेता, शहरातील भुखंड धारक व्यक्ती एखादी इमारत उभारु किंवा पुन्हा उभारण्यासाठी किंवा इमारत रेखाचित्र म.न.पा. अधिनियम मधील कलम 273 व 274 मध्ये नोटीस देवून रेखाचित्र 60 दिवसांचे आत मंजूर करण्याची विनंती म.न.पा. कडे करीत असते.

प्रचलित पध्दतीने हे काम कार्यालयात यापूर्वी करीत होते परंतू नागरीकांना चांगली सुविधा द्यावी या उद्देशाने गेल्या सहा महिन्यापूर्वी ''ऑटो डी.सी.आर.'' ही पध्दती अमंलात आणली होती. यामुळे 24 तासात रेखाचित्र मंजूर होईल अशी कार्यालयाने स्थायी समितीस हमी दिली होती.

सध्या स्थितीत या पध्दतीमुळे अर्जदार व्यक्तीचे रेखाचित्र 4—5 महिने मंजूर होत नाही अशी तक्रार सातत्याने होत आहे व त्यामुळे अर्जदारास फार त्रास होत आहे ही प्रक्रिया लोकाभिमुख का होत नाही याची तपासणी करणे हे प्रशासनाचे काम होते. परंतू याबाबत ते अपयशी ठरले असे निर्दशनास आले.

ज्या कंपनीस सॉप्टवेअरचा विकासाचे काम दिले आहे ते अद्याप पुर्ण झालेले नाही. त्यांनी कंत्राटाच्या करारनामाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केले आहे का ? ही पध्दती पुर्णपणे अमंलात का आली नाही याची चौकशी करणे जरुरी वाटते.

ज्या कंपनीस हे कार्य देण्यास आले आहे त्यांचे द्वारे अटी व शर्तीचे बाहेर जाऊन अर्जदाराकडून अधिकचे शुल्क वसुल करण्यात येते आहे अशी नागरीकांची व नगरसेवकांची तक्रार आहे.

अजून पर्यंत हॉर्डवेअर मशीन्स व इतर उपकरणे कंपनीने लावली नाही व सॉफ्टवेअर चे काम पूर्ण झाले नाही ही बाब कार्यालयाने स्पष्ट केली. या सर्व बाबींची चौकशी करुन स्थायी समिती समोर अहवाल सादर करण्यास्तव खालील उप समिती गठीत करण्याची एकमताने मंजूरी प्रदान केली.

| | | |
|---|---|---|
| श्री नरेंद्र ऊर्फ बाल्या बोरकर | — | अध्यक्ष |
| श्री अशोक काटले | — | सदस्य |
| श्री विनोद वालदे | — | सदस्य |
| श्री अशोक मुळे | — | सदस्य |
| श्री मनोज तालेवार (कार्य. अभि.) | — | सदस्य |
| श्री संजय गायकवाड (नगरयंत्री) | — | सदस्य |

## गठीत समितीचा दि. 21/8/2009 रोजी
## घेतलेल्या सभेचा अहवाल

### उपस्थिती सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री नरेंद्र ऊर्फ बाल्या बोरकर | — | अध्यक्ष |
| श्री अशोक काटेल | — | सदस्य |
| श्री विनोद वालदे | — | सदस्य |
| श्री मनोज तालेवार (कार्य. अभि.) | — | सदस्य |

मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी ऑटो डी.सी.आर. संदर्भातील कामकाजाची चौकशी करण्याकरिता स्थायी समितीच्या सदस्यांची उपसमिती गठीत केली, त्या उपसमितीच्या चर्चेचा संक्षिप्त वृत्तांत –

सभेत गठीत केलेल्या उपसमितीचे मा. अध्यक्ष, श्री बाल्या बोरकर, मा. सदस्य, श्री वालदे, मा. सदस्य, श्री मुळे, मा. सदस्य, श्री काटले, नगरयंत्री, कार्यकारी अभियंता, बांधकाम तसेच संचालक, नगर रचना व विभागातील इतर अधिकारी वर्ग उपस्थित होते.

मा. अध्यक्ष, उपसमिती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली, सभेच्या सुरुवातीस प्रश्नावली सादर करुन खालील प्रमाणे माहिती विचारण्यांत आली.

**1. ऑटो डी.सी.आर. वापरण्याची प्रचलीत पध्दती काय आहे व तांत्रिक दृष्टया ती कश्या प्रकारे वापरली जाते व विभागात जुन्या प्रचलित पध्दती पेक्षा या मध्ये नागरिकास काय फायदा होत आहे याची विभागाने स्पष्टता करावी.**

- या प्रश्नाच्या संदर्भात संचालक, नगररचना यांनी माहिती देतांना सांगीतले की, नागपूर महानगरपालिका हद्दीत एम.आर.पी.टी. ॲक्टनुसार बांधकामाला परवानगी देण्यांत येते. अर्जदाराने सादर केलेल्या रेखाचित्रात मानवी त्रृटया घडू नये किंवा काही त्रृटया झाल्या असेल तर त्याचे निर्मुलन व्हावे या दृष्टीकोणातून 1 एप्रिल 2009 पासून ऑटो डी.सी.आर. ची सुरुवात करण्यांत आलेली आहे. एम.आर.पी.टी ॲक्ट मध्ये इमारत नियमावली करिता जे मुद्दे दिले आहे त्यानुसार साफ्टवेअर तयार करण्यांत आलेले आहे. वास्तुशिल्पकार जो इमारत रेखाचित्र सादर करतो, त्यात त्यांनी काय सादर केले आहे. त्यात काही चुका आहे काय? ऑटो डी.सी.आर. त्याला रिड करतो, त्यात काही चुक असेल तर रेखाचित्र मंजूर होत नाही व त्याच काही चुका नसेल तर ऑटो डी.सी.आर. त्या रेखाचित्रास योग्य आहे असे ठरवितो, जे.एन.एन.यु.आर.एम. प्रोजेक्टमध्ये नागरिकांना फायदा मिळण्यांसाठी ही पध्दत अवलंबविण्यात यावी, असे म्हटले आहे. त्याप्रमाणे मा. आयुक्तांच्या आदेशाने ही कार्यवाही सुरु आहे.

**2. या प्रकल्पाची निविदा काढण्यापूर्वी या प्रकल्पास मंजूरी कुणी दिली ?**

- विभागाकडुन या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, कलम 63 मध्ये मा. आयुक्त प्लॉन सॅक्शन करण्याकरिता यंत्रणा राबवु शकते असे नमुद आहे त्यानुसार मा. आयुक्तांनी या प्रकल्पाला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे, स्थायी समितीने या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दिली नाही किंवा म.न.पा. सभागृहाने सुध्दा यास प्रशासकीय मंजूरी दिली नाही. निवेदेस स्थायी समितीने मान्यता काही अटी व शर्तीवर दिली.

**3. ऑटो डी.सी.आर. या प्रकल्पाची सुरुवात महाराष्ट्रातील किती महानगरपालिकेत आहे. याची माहिती विभागाकडे आहे काय? ती आपण वापरतो त्याच पध्दतीने आहे काय ?**

- औरंगाबाद म.न.पा. ची फक्त माहिती आहे.

**4. प्रकल्प राबविण्यापुर्वी या विषयाच संबंधीत योग्य व्यक्तीचा तांत्रिक सल्लागार म्हणून काही मत घेतले आहे काय ?**

- नाही.

5. **या प्रकल्पाची सुरुवात करण्यापुर्वी हा धोरणात्मक निर्णय आहे असे कार्यालयास वाटले नाही का ?**

   - विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की बांधकामाच्या संदर्भात यंत्रणा राबविण्याचे अधिकार मा. आयुक्तांचे आहे, या प्रकरणाची संपुर्ण माहिती स्थायी समितीसमोर ठेवण्यात आली होती, यात रेट काय राहणार आहे, या बाबीला स्थायी समितीने मंजूरी दिली होती.

6. **जर हा धोरणात्मक निर्णय आहे तर म.न.पा. सभागृहात मंजूरीसाठी ठेवण्यात आला काय ? यास म.न.पा. महासभेची मान्यता आहे काय नसल्यास घेण्याची जरुरी वाटली नाही काय ?**

   - विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, या प्रश्नाला स्थायी समितीची मान्यता मिळाल्यामुळे म.न.पा. सभागृहासमोर ठेवण्याची गरज निर्माण झाली नाही, म.न.पा. मध्ये ऑटो डी.सी.आर. मा. आयुक्तांच्या परवानगीने लागु करण्यात आले.

7. **म.न.पा. कायदा किंवा उपविधि या मध्ये प्रचलित ऑटो डी.सी.आर. पध्दतीने मंजूरी घेणे नागरीकांना बंधन कारक आहे काय ?**

   - विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की एम.आर.पी.टी. ॲक्टमध्ये या प्रणालीचा कुठेही उल्लेख नाही, याचे पालन प्रत्येक नागरिकांनी केले पाहिजे, असे बंधन नाही, जर एखाद्या व्यक्तिने मॅन्युअली रजिस्टर अे.डी.ने. नकाशा पाठविला तर त्याची रिपोर्टींग घेवून नकाश्याला मंजूरी देता येवू शकते, परंतू सध्या ही प्रणाली अंमलात असल्यामुळे याप्रमाणे नकाशा सादर करणे जरुरीचे आहे.

8. **निविदा स्थायी समितीने मंजूर केल्यावर स्थायी समितीने टाकल्या त्या अटी व शर्तीचे तंतोतंत पालन कार्यालयाने केले आहे का ? तसेच कायद्याच्या सल्लागाराचे अभिमत घेतले आहे त्या मध्ये काय स्पष्ट केले आहे याची माहिती द्यावी.**

   - विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, स्थायी समितीने ठराव क्रमांक 282 नुसार या विषयाला मंजूरी प्रदान केली आहे. यामध्ये त्यांनी काही सूचना केल्या आहे, त्याचे तंतोतंत पालन करण्यात येत आहे. उदा. प्रतिवर्ष 5 टक्के दरात वाढ, कराराच्या अटी व शर्ती स्थायी समिती समोर ठेवण्यात याव्या, या प्रणालीत नागरिकांचे हित जोपासण्यात यावे, त्याप्रमाणे कामे सुरु आहे.

9. **या कामाचा कार्यादेश किती तारखेस देण्यात आला व त्याचा करारनामा किती तारखेस झाला.**

   - विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, 12–2–09 ला या कामाचे कार्यादेश देण्यात आले, 7–11–09 ला कायद्याचे सल्लागाराचे अभिमत मागविण्यांत आले व 9–11–09 ला या कामाचा करारनामा करण्यांत आला.

10. **कार्यादेश दिल्यानंतर ज्या कंत्राटदारास या प्रकल्पाचे काम दिले आहे ते कोणत्या प्रकारे काम करीत आहे, याची माहिती द्यावी.**

- विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, साफ्वेअर कंपनीने साफ्टवेअर तयार केलेला आहे व वंश इंफोटेक्ट ही कंपनी याला ऑपरेट करीत आहे, वास्तुशास्त्रज्ञ आपल्या ड्राईंगचे ऑटो कार्डमध्ये प्लॉन करुन आणतात, त्यात त्यांना किती मजले बांधावयाचे आहे, हे साफ्टवेअर त्याला चेक करुन सर्व साईज डिफाईन करतो, समजा पहिला मजला 4 माळयाचा असेल तर त्यामध्ये वेगवेगळया लेअर येते, त्याप्रमाणे प्रि–डी.सी. आर. मध्ये पुर्ण प्लॉन रि–ड्रॉ करतो, या सगळया लेअर रि–ड्रा केल्यानंतर प्रि–डी.सी.आर. ची ड्राईंग ऑटो डी.सी.आर. मध्ये प्रिंट होते. त्याप्रमाणे ऑटो डी.सी.आर. प्रत्येक मजल्यामध्ये दर्शविलेल्या खोलीचा 20 पानाचा स्क्रुटनी रिपोर्ट सादर करतो. त्याप्रमाणे त्यात काय असले पाहिजे ओ.के ऑर नॉट याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. सुरुवातीच्या महिन्यामध्ये असे वाटत होते की हे साफ्टवेअर लोकाभिमुख नाही परंतू आता या योजनेमुळे नागरिकांमध्ये जागृती निर्माण झाली आहे. प्रि–डी.सी.आर. ची सी.डी. असेल तर ऑटो डी.सी.आर. मध्ये त्याला कन्वर्ट करण्यास 15 मिनिटाचा कालावधी लागणार नाही. ही पध्दती चांगली आहे, असे सांगण्यात आले.

11. **अटी व शर्तीचे पालन कंत्राटदार करतो आहे का व त्याचा अहवाल कार्यालय घेत आहे का? जर घेतला असल्यास तो दाखवा.**

- विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, संबंधीत एजंसीला तीन दिवसात प्लॉन मंजूर करावयाचे आहे. प्लॉन कोणत्या तारखेला सबमिट करण्यांत आला, याकरिता आऊटवर्ड, इनवर्ड रजिस्टरमध्ये तारीख तपासण्यांते येते, त्याप्रमाणे तीन दिवसापेक्षा जास्त कालावधी झाला असेल तर लेटचा स्टॅम्प मारुन जे.ई. कडे पावविण्यांत येते, त्याप्रमाणे जे.ई. द्वारा पॅनाल्टीची डिमांड देवून दंड आकारण्यात येतो. करारनाम्यात पॅनाल्टीचा क्लॉज नव्हता, याबाबत म.न.पा. च्या कायद्याच्या सल्लागाराचे मत घेवून हा क्लॉज ॲड करण्यांत आला आहे.

12. **ज्या दिवसापासून हा प्रकल्प अस्तित्वात आला तेव्हापासून आता पर्यंत किती रेखाचित्र मंजूर झाले व एकूण किती रेखाचित्र सादर झाले (नोंदणी बुक कार्यालयाचे / कंत्राटदाराचे) समितीला दाखविण्यांत यावे.**

- विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भा सांगण्यात आले की या महिन्याच्या 8 तारखेपर्यंत 1168 प्लॉन सादर करण्यात आले. (याबाबत तयार करण्यात आलेल्या चार्टची प्रत समितीला सादर करण्यांत येईल.)

13. **रेखाचित्रांच्या पंजीबध्दता किंवा नोंदणी कोणत्या प्रकारे होत आहे.**

- विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, जुन्या पध्दतीप्रमाणे पैस घेण्यांत येते, स्थायी समितीने छाणणीकरिता जे पैसे ठरविले आहे त्यात 10 रुपये पर स्के.मि. ॲड करण्यांत आले आहे तसेच ड्राईंगची 1 कॉपी 150 रुपये प्रमाणे देण्यांत येते व याबाबतची साईट इंटरनेटवर फ्री उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे, प्रि–डी.सी.आर. झाल्याशिवाय ऑटो डी.सी.आर. वर सी.डी. लोड होत नाही.

14. **म.न.पा. च्या या विभागात जे अधिकारी आहेत त्यांना साफ्टवेअर विषयी माहिती आहे का किंवा त्यांना हे हाताळता येते का ?**
   - विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात माहिती देण्यात आली की, संबंधीत एजंसी याबाबत कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग देणार आहे, करारनाम्यात ही अट टाकण्यांत आली आहे. संबंधीत कंपनीच्या परफॉरमंसनुसार त्यांना दर एका वर्षाने नुतनीकरण करावे लागेल. जेव्हापासून या विभागातील स्टॉफ कमी झालेला आहे. हे साफ्टवेअर 100 प्रतिशत यशस्वी झालेले नाही यामध्ये काही त्रृटया आहे, त्या त्रृटया दुर करण्याचा प्रयत्न विभागाकडून सुरु आहे.

15. **संपूर्ण प्रलंबित प्रकरणाची माहिती देण्यांत यावी, या पध्दतीमुळे म.न.पा. स आतापर्यंत किती उत्पन्न प्राप्त झाले व या उत्पन्न वाढीस या पध्दतीचा किती फायदा झाला, मागील पाच वर्षाच्या उत्पन्नाची आकडेवारी द्यावी.**
   - विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, आतापर्यंत 1 एप्रिल ते 31 डिसेंबर 2009 पर्यंत 16.58 लक्ष रुपये उत्पन्न प्राप्त झालेले आहे. (याची प्रत समितीला सादर करण्यात येईल)

16. **जुन्या पध्दतीने रेखाचित्र मंजूर झाल्यावर म.न.पा.स द्यावयाचे शुल्काचे दर काय आहे.**
   - विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, स्थायी समितीने जे दर मंजूर केले आहे त्यात 10 रुपये पर स्के.मि. अतिरिक्त जोडण्यांत आले आहे (या रेटची प्रत समितीला सादर करण्यांत येईल)

17. **नागरिकांना वास्तुशिल्पकाराच्या शुल्का व्यतिरिक्त या कंत्राटदारास किती अधिकचे भुगतान करावे लागते याचा अंदाज सांगा.**
   - विभागाकडून या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, अतिरिक्त 10 रुपये पर स्के.मि. व 150 रुपये प्रति प्रिंट असे 4 प्रिंटचे 600 रुपये द्यावे लागते.

18. **या प्रकरणात कंत्राटदाराने अटी व शर्तीचे पालन न केल्या काही दंडात्मक कारवाई केली आहे काय ?**
   - विभागाकडुन या प्रश्नाच्या संदर्भात सांगण्यात आले की, यात पॅनाल्टी क्लॉज दिलेला आहे एखाद्या प्लॅान लेट झाला तर लेट मार्क करुन दंड आकारण्यात येतो.

यानंतर मा. अध्यक्ष, उप समिती यांनी 1 फेब्रुवारी 2010 ला पुन्हा या विषयासंदर्भात चर्चा करण्यात येईल, त्यात आर्किटेक्ट असोसिएशन, लायसेंस सर्व्हेअर असोसिएशन व बिल्डर असोसिएशनच्या प्रतिनिधीना बोलाविण्यांत यावे, असे सूचित करुन सभा समाप्तीची घोषणा केली.

## दिनांक 4/2/2010 ला घेतलेल्या सभेचा वृत्तांत

मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी ऑटो डी.सी.आर. संदर्भातील कामकाजीची चौकशी करण्याकरिता स्थायी समितीच्या सदस्यांची उपसमिती गठीत केली, त्या उपसमितीची सभा गुरुवार दिनांक 4/2/2010 रोजी 12.00 वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात संपन्न झाली त्या सभेच्या चर्चेचा संक्षिप्त वृत्तांत.

सभेत गठीत केलेल्या उपसमितीचे मा. अध्यक्ष, श्री बाल्या बोरकर, कार्यकारी अभियंता, बांधकाम तसेच संचालक, नगररचना व विभागातील इतर अधिकारी वर्ग तसेच शहरातील बिल्डर असोसिएशने प्रतिनिधी व आर्किटेक्ट असोसिएशनचे प्रतिनिधी उपस्थिती होते.

मा. अध्यक्ष, उपसमिती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली, सभेच्या सुरुवातीस त्यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले, तद्नंतर त्यांनी सांगीतले की, नागपूर महानगरपालिकेत ऑटो डी.सी.आर. ही पध्दत अंमलात आणण्यात आली आहे, या पध्दतीमुळे आपल्या कामात कोणते फायदे झाले आहे, त्याचे वर्णन थोडक्यात सादर करण्यांत यावे.

- ऑटो डी.सी.आर. च्या संदर्भात चेअरमन, इंजिनिअर आर्केटेक्ट असोसिएशनचे वसंत रानडे यांनी आपले विचार व्यक्त करतांना सांगीतले की, म.न.पा. ऑटो डी.सी.आर.ची जी पध्दत लागू करण्यांत आली आहे, या संदर्भात मागे झालेल्या सभेत सांगण्यात आले होते की या पध्दतीमुळे इमारत रेखाचित्र मंजूर होण्याचे काम सोपे होईल, परंतू तसे झालेले नाही. मार्केटमध्ये जी नवीन तंत्रज्ञान आलेले आहे त्याला आपण नाकारु शकत नाही, त्यामुळे त्याला महत्व द्यावे लागेल. प्रि–डी.सी.आर. साफटवेअरमध्ये ऑटो कॅड व्हर्शन सोडून दुसरे व्हर्शन कोट होत नाही, ॲटी व्हर्शनला ऑटो डी.सी.आर. कोट करीत नाही. लिगल व्हर्शनची सुध्दा आम्हाला बाहेरुन करावे लागते, ऑटो डी.सी.आर. ला आमचा विरोध नाही परंतू या साफटवेअरमध्ये सर्व व्हर्शनची कॉम्पीटीबीलीटी व्हावयास पाहिजे, आम्हाला सांगण्यात आले होते की, सहा महिन्यात सर्व सिस्टीम कॉम्लीटेबल होईल, परंतू अजूनपर्यंत हे काम झाले नाही. आम्हाला प्रि–डी.सी.आर. बाहेरुन करावे लागत असल्यामुळे त्यात अधिकचा बोझा आमच्यावर पडतो. ज्या दिवशी आम्ही नकाशे सादर करतो त्याच्या दोन–तीन दिवसानंतर त्या संदर्भातील उणीवा कळवून द्यावयास पाहिजे, यामुळे आमचा वेळ वाया जाणार नाही. ज्याप्रमाणे आपण पुणेच्या धर्तीवर नागपूर महानगरपालिकेत ऑटो डी.सी.आर. सिस्टीम लागू केली आहे परंतू त्यात नागपूरच्या डी.सी.आर. प्रमाणे करेक्शन करण्यात आले नाही. या आवश्यक बाबीकडे लक्ष देणे जरुरीचे आहे असे त्यांनी सांगीतले.
- ऑटो डी.सी.आर. च्या संदर्भात बिल्डींग असोसिएशनचे वसंत रानडे यांनी आपले विचार व्यक्त करतांना सांगीतले की, आपण पहिल्यांदा प्रि डी.सी. आर. केल्यानंतर ऑटो डी.सी.आर. चे पैसे भरले व त्यात काही बदल झाले व पुन्हा ऑटो डी.सी.आर. करावा लागला तर पुन्हा आम्हाला त्याचे पैसे भरावे लागते, यामुळे अधिकचा डबल बोझा आमच्यावर पडतो आहे, त्यामुळे लहान ड्राईंगचे 150 रुपये, मोठया ड्राईंगचे 150 रुपये आम्हाला द्यावे लागत आहे. तुम्ही दिलेल्या एक प्रिंटमधून 4 प्रिंट बाहेरुन काढता येते, आपण साईज वाईज चार्जेस फिक्स केले तर यात पेपरवर्क्समध्ये लागणारी नैसर्गिंक संपत्ती वाया जाणार नाही. आपण पेपर्सवर जो काम करीत आहे ते बॉयपास केले व तो रिपोर्ट इंजिनिअरनी चेक केला तर

आमचा वेळ व पैसा दोन्ही वाया जाणार नाही. मॅन्युअल प्रोसीजरमध्ये असे चार्जेस घेण्यांत येत नव्हते. तसेच ऑटो डी.सी.आर. च्या संदर्भात जे साफ्टवेअर मध्ये इनकार्पोरेट करण्यात अडचण निर्माण होत आहे. आपण त्याची स्पीड वाढविली व साफ्टवेअर एकमेकांशी संलग्न केले तर चांगले होईल, याकडे सुध्दा लक्ष देणे जरुरीचे आहे. तसेच ऑटो डी.सी.आर. करतांना टोकन सिस्टीम स्विकारली पाहिजे, ज्याचा प्रि डी.सी.आर. पहिले येईल, त्याला पहिले संधी दिली पाहिजे. ऑटो डी.सी.आर. करिता जे चार्जेस घेण्यांत येते, त्याप्रमाणे कोण–कोणत्या सुविधा परफॉर्म करण्यात येते, स्कोप ऑफ वर्कची कॉपी सर्वांना देण्यांत यावी. या सिस्टीममध्ये जी नवीन टेक्नालॉजी आत्मसात करण्यात येत आहे ती सोपी असणे जरुरीचे आहे. त्यात भुर्दंड जास्त नसावा याकडे सुध्दा विभागाने लक्ष द्यावे.

बिल्डर असोसिएशनच्या प्रतिनिधीनी सांगीतले की, पुर्वी आर्किटेक्ट घराचा नकाशा नगररचना विभागांत सादर करायचे, तो तपासून त्याला मंजूरी दिली जायची हे काम शास्त्रशुध्द पध्दतीने व्हावे यासाटी ऑटो डी.सी.आर. ही प्रणाली लागू करण्यांत आली आहे या पध्दतीनुसार आर्किटेक्ट द्वारे एक सीडी मध्ये घराचा नकाशा मागीतला जातो. त्याकरिता आमच्याकडून 500 रुपये शुल्क आकारण्यात येते, नंतर ही सी.डी. ऑटो डी.सी.आर. या साफ्टवेअर मध्ये तपासली जाते, हया पध्दतीमध्ये दोष आहे, याकडे लक्ष देण्यांत यावे. प्रि डी.सी.आर. बाबत सुरुवातीला जे प्रशिक्षण देण्यात आले होते त्याचा लाभ सर्वच अभियंता व वास्तुशास्त्रज्ञ यांना झाला नाही. त्याकरिता प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, ऑटो डी.सी.आर. साठी जे साफ्टवेअर वापरण्यात येत आहे, त्या साफटवेअरची क्षमता बरोबर नाही. या साफ्टवेअर मध्ये असलेल्या लहान सहान त्रुटीबाबत वास्तुशास्त्रज्ञाला बोलावून दुरुस्त केल्या जात नाही, त्यामुळे आमचे नकाशे नामंजूरीचे प्रमाणे वाढले आहे, अनेक प्रकरणात जी चटई क्षेत्र निर्देशांक मर्यादा स्पष्ट करण्यांत आली आहे ती या साफ्टवेअर मध्ये स्पष्ट नमुद होत नाही, त्यामुळे कार्यालयीन तपासणी व ऑटो डी.सी.आर. अशा दुहेरी मंजूरीच्या प्रक्रियेतुन जावे लागत आहे, एखादे रेखाचित्र तपासण्यासाठी महानगरपालिकेला तपासणी शुल्क द्यावे लागते पण या व्यतिरीक्त इतर शुल्क ही द्यावे लागत आहे. हा अधिकचा अधिभार आहे, करिता या साफ्टवेअर चा गुणात्मक दर्जा उंचावण्यात यावा, या संदर्भातील सर्व माहितीचे प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे, असे सांगण्यात आले.

यानंतर ज्या एजंसीने ऑटो डी.सी.आर. उपलब्ध केले आहे त्यांनी सांगीतले की, ऑटो डी.सी.आर. च्या प्रत्येक व्हर्शनला कॉम्पीबीलीटी उपलब्ध करुन देण्यांत येईल, तसेच स्कोप ऑफ वर्कची कॉपी सुध्दा सर्वांना उपलब्ध करुन देण्यांत येईल. तसेच ऑटो डी.सी.आर.च्या साफटवेअरचा डेमो येणाऱ्या 15 दिवसांत सादर करण्यात येईल, असे विभागाद्वारे सांगण्यात आले.

सरतेशेवटी सभेत गठीत केलेल्या उपसमितीचे मा. अध्यक्ष, श्री बाल्या बोरकर यांनी सांगीतले की, बिल्डींगचे रेखाचित्र मंजूर करण्यासाठी महानगरपालिकेने खाजगी एजन्सीमार्फत सुरु केलेल्या ऑटो डी.सी.आर. प्रणालीमध्ये बऱ्याच त्रुटी असल्याची तक्रार बिल्डर्स असोसिएशन ऑफ लायसन्स इंजिनिअर्सने केली आहे, हया सर्व त्रृटी लेखी स्वरुपात सादर करण्यांत यावी, त्या दुर करण्याचे पुरेपुर प्रयत्न करण्यांत येईल. आज बैठकीत महानगरपालिकेते ऑटो डी.सी.आर. पध्दती अंमलात आणल्यानंतर नागरिकांच्या

रेखाचित्र मंजूरीबाबत काय फायदा झाला यावर सांगोपांग चर्चा झाली, ऑटो डी.सी.आर. प्रणाली लागू केल्यानंतर नागरिकांना या पध्दतीचा त्रास होत आहे. लहान लहान त्रृटी आढळल्यास वास्तुशास्त्रज्ञला बोलावून त्या दुरुस्त केल्या जात नाही. त्यामुळे रेखाचित्र नामंजूरीचे प्रमाणे वाढले आहे. संबंधित कंपनीनी या तक्रारीचे दखल घेवून त्या त्रृटया लवकर दुर कराव्या, असे त्यांना आदेश देण्यांत येते व हया त्रृटया दुर झाल्या की नाही याची शहानिशा करण्याकरिता 28 फेब्रुवारी रोजी दुपारी 12.00 वाजता संबंधीतांसोबत पुन्हा बैठक घेण्यात येईल. लहान लहान त्रुटी आढळल्यास वास्तुशास्त्रज्ञला बोलावून त्या दुरुस्त केल्या जात नाही, त्यामुळे रेखाचित्र नामंजूरीचे प्रमाण वाढले आहे. ज्याप्रमाणे नाशिक, पुणे, औरंगाबाद व मुंबई मध्ये ही प्रणाली सुरु आहे. त्याठिकाणच्या प्रणालीच्या अभ्यास करण्याकरिता श्री मेहर, उप संचालक नगररचना विभाग यांनी समितीचे सर्व मा. सदस्य व झोन क्र. 1 व 6 च्या सभापतीला घेवून दौरा आयोजित करावा व त्या दौऱ्याचे मिनिटस् तयार करण्याकरिता श्री फरकासे व श्री रिजवान खान, रिपोर्टर, समिती विभाग यांना सुध्दा सोबत घेण्यात यावे.

यानंतर मा. अध्यक्ष, उप समिती यांनी 28 फेब्रुवारी 2010 ला पुन्हा या विषया संदर्भात चर्चा करण्यांत येईल, त्यात आर्केटेक्ट असोसिएशन, लायसेंस सर्व्हेअर असोसिएशन व बिल्डर असोसिएशनच्या प्रतिनिधीना बोलाविण्यांत यावे, असे सूचित करुन सभा समाप्तीची घोषणा केली.

## दिनांक 2 ऑगस्ट ते 4 ऑगस्ट 2010 दरम्यान
## पुणे, औरंगाबाद, मुंबई महानगरपालिका येथील प्रत्यक्ष भेटीचा अहवाल

वर्ष 2009 ते 2010 चे स्थायी समितीद्वारा नगर रचना विभाग, महानगरपलिका, नागपूर येथे कार्यान्वित असलेल्या ऑटो डी.सी.आर. प्रणाली संदर्भात नागरिकांच्या तक्रारी असल्याने व ही प्रणाली अधिक कार्यक्षम व कार्यरुपास होण्याचे दृष्टीने या संदर्भात तात्कालीन स्थायी समिती सदस्य श्री नरेंद ऊर्फ बाल्या बोरकर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करण्यात आली. या चौकशी समितीत

1) श्री नरेंद्र ऊर्फ बाल्या बोरकर, अध्यक्ष
2) श्री अशोक काटले, सदस्य
3) श्री विनोद वालदे, सदस्य
4) श्री अशोक मुळे, सदस्य
5) श्री मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता
6) श्री गायकवाड, नगरयंत्री यांचा समावेश आहे.

जानेवारी 2010 या समितीद्वारे नगर रचना विभागातील या प्रणालीचा प्रत्यक्ष अभ्यास केला तसेच वर्ष 2009 ते 2010 मध्ये या प्रणाली मार्फत तपासणी केलेल्या बांधकाम नकाशांची, या प्रणालीमधील आढळलेल्या त्रृटयांबाबत तसेच संगणकावर प्रणाली चे कार्यन्वितीबाबत माहिती जाणून घेतली. त्यानंतर या समितीने शहरातील बिल्डर असोसिएशन व आर्किटेक्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन या प्रणाली बाबत त्यांचे विचार व प्रणाली अधिक कार्यक्षम करण्याकरिताची उपाय योजना बाबत माहिती जाणून घेतली.

त्यानंतर मार्च 2010 मध्ये ही प्रणाली कार्यान्वित असलेल्या मुंबई महाननगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका, पुणे महानगरपालिका या ठिकाणी समितीने दौरा करण्याचे व त्याच्या ठिकाणी सुरु असलेल्या प्रणालीचा अभ्यास करणे व

त्या दृष्टीने येथील प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासंबंधी उपाययोजना करण्याचे ठरले. त्यानुसार कार्यालयीन दौरा करण्याकरिता तत्कालीन आयुक्त यांचे मान्यतेने दौरा निश्चित करण्यात आला परंतू वर्षा अखेरचा काळ असल्याने दौरा स्थगित करण्यात आला.

त्यानंतर हा दौरा दिनांक 2 ऑगस्ट ते 4 ऑगस्ट 2010 या काळात करण्यात आला. दौऱ्यात या आधीच्या समितीतील अध्यक्ष श्री नरेंद्र ऊर्फ बाल्या बोरकर, सदस्य श्री अशोक काटले, तसेच विद्यमान स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे श्री सुधीर राऊत व श्री हितेश जोशी यांचा व श्री तालेवार, कार्यकारी अभियंता, श्री मेहर, सहा. संचालक नगर रचना विभाग, श्री आर.एस.भुते, उप अभियंता, नगर रचना, श्री प्रफुल्ल फरकसे स्विय सहा. मा. अध्यक्ष, स्था.स. यांचा समावेश होता. या दौऱ्यात प्रथम मुंबई महानगरपालिकेच्या विक्रोळी येथील इमारत विभागास भेट देण्यात आली व तेथील ऑटो डी.सी.आर. प्रणालीबाबतची विस्तृत माहिती प्राप्त करण्यात आली. त्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकेला भेट देऊन तेथील ऑटो डी.सी.आर. प्रणालीची पाहणी करण्यात आली व कार्यान्वितीबाबत माहिती प्राप्त करण्यात आली.

उपरोक्त तीन महानगरपालिकांच्या दौऱ्यातील ऑटो डी.सी.आर. प्रणाली संदर्भात अहवाल निष्कर्ष पुढील प्रमाणे आहे.

**मुंबई महानगरपालिकेतील कार्यप्रणाली :**

म.न.पा.तील संगणक ज्ञान असलेल्या तांत्रिक अधिकारी/कर्मचारी या प्रणालीचे सर्वश्रुत प्रशिक्षण म.न.पा. द्वारे स्वखर्चाने देण्यात आलेले आहे. त्या प्रमाणालीकरिता लागणारे सर्व हार्डवेअर व सॉफ्टवेअर म.न.पा. ने स्वखर्चाने घेतलेले असून ही प्रणाली कार्यान्वित केलेली आहे. अतिरिक्त प्रशासकीय शुल्क आकारावे किंवा नाही यावर त्यांचा अद्याप निर्णय झालेला नाही. उपविधी मधील तरतुदी नुसार जे तपासणी शुल्क आकारण्यात येते.

मुंबई शहरात स्वतंत्र भुखंड किंवा छोटया आकाराचे भुखंड फार कमी प्रमाणात आहे. जास्तीत जास्त जमीन विकासकाद्वारे विकासीत करण्यात येते व तेच रेखाचित्र मंजूरी करिता सादर करीत असतात. त्यामुळे नागरीकांचा प्रत्यक्ष सहभाग फार कमी प्रमाणात आहे.

शाहानिशा दर हे अतिरिक्त दर असल्याने काही प्रमाणात या प्रणालीला नागरीक, वास्तुशास्त्रज्ञ व विकासक यांचा विरोध आहे.

चर्चेमध्ये मुंबई महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने असे मत स्पष्ट केले की, या प्रणालीकरिता लागणारे संगणक, प्रिंटर्स, प्लॉटर्स, सुस्थिती व दुरुस्ती करिता नागरिकांकडून अतिरिक्त शुल्क आकारावे लागतील. अतिरिक्त शुल्काती 50 टक्के रक्कम सुस्थिती व दुरुस्तीकरिता व उर्वरित रक्कम म.न.पा. च्या आय मध्ये जमा करता येतील. तसा प्रस्ताव महासभेसमोर अग्रेषित करुन महासभेची मंजूरी झाल्यावर योग्य निर्णय घेता येईल.

**पुणे महानगरपालिकेतील कार्यप्रणाली :**

पुणे महानगरपालिकेत ऑटो डी.सी.आर. प्रणाली 1 जुन, 2008 पासून म.न.पा. मार्फतच प्रणाली कार्यान्वित आहे. म.न.पा. अधिकारी/कर्मचाऱ्यांना गट निहाय प्रणाली

संदर्भात प्रशिक्षण देण्यात येते. पुणे महानगरपालिकेत बांधकामाचे नकाशे अर्जदाराने सादर केल्यानंतर वास्तुशिल्पकाराकडून रेखाचित्र नियमाप्रमाणे आहे याची खात्री झाल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने मंजूरी करिता सादर करण्यात येतात. त्यामुळे मंजूरी करिता सादर केल्यानंतर नकाशा मंजूरीचे काम जलद गतीने होत असल्याचे दिसून आले आहे.

पुणे महानगरपालिकेत ऑटो डी. सी.आर. प्रणालीचे कामकाज हे म.न.पा. अधिकारी/कर्मचारी यांचे मार्फत केले जाते. हार्डवेअर व सॉफ्टवेअर दुरुस्ती करिता व देखभाली करिता स्वतंत्र एजेन्सीची नेमणूक करण्यात आलेली आहे. पुणे महानगरपालिकेत आर्किटेक, लायसन्स इंजिनिअर यांचे करिता स्वतंत्र कक्ष आहे. या कक्षात प्री ऑटो डी.सी.आर. व ऑटो डी.सी.आर. करिता स्वतंत्र सॉफ्टवेअर नागरिकांच्या येणाऱ्या रेखाचित्रात दुरुस्तीकरिता ठेवण्यात आलेले आहे.

**औरंगाबाद महानगरपालिकेतील कार्यप्रणाली :**

औरंगाबाद महानगरपालिकेत ऑटो डी.सी.आर. प्रणाली कंत्राटी पध्दतीने सुरु आहे. प्री ऑटो डी.सी.आर. चे दर कंत्राटदारास निश्चित करुन दिले आहे. प्री ऑटो डी. सी.आर. झाल्यावर रेखाचित्र सादर करण्यात येतात. त्यातील त्रृटया व दुरुस्त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत मनुष्यबळ पध्दतीने करण्यात येते. शाहानिशा दर रहिवासी प्रस्तावाकरिता रु. 8/— प्रति चौ.मी. आहे. व वाणिज्यीक करिता रु. 16/— प्रति चौ.मी. आहे. ही सर्व राशी म.न.पा. खात्यात जमा होवून नंतर करारनाम्याप्रमाणे कंत्राटदाराला भुगताना तेथे पध्दत आहे. यापासून औरंगाबाद महानगरपालिकेला उत्पन्न होत असते असे सुध्दा लक्षात आलेले आहे.

**उपरोक्त सर्व बाबींचा अभ्यास केल्यावर खालील निष्कर्षाप्रत ही समिती आलेली आहे.**

निष्कर्ष :—

1) स्थायी समिती ठराव क्र. 282 दि. 18/11/2008 प्रमाणे निविदेस मंजूरी प्रदान करण्यात आली.

2) एन.एम.सी./टी.पी./ऑटो डी.सी.आर./1890 दि. 12/02/2009 ला कार्यादेश देण्यात आला. परंतू स्थायी समिती ठरावातील अटी व शर्ती चा उल्लेख या कार्यादेशात देण्यात आलेला नाही. याचे कारण कार्यादेश देण्यात आल्यानंतर निविदाकाराबरोबर दि. 10 ऑक्टोंबर, 2009 ला करारनामा करण्यात आला.

3) कार्यादेश व करारनामा करण्यामध्ये एकूण 8 महिन्याचा कालावधी कार्यालयाने घेतला महानगरपालिकेत करारनामा प्रथम व नंतर कार्यादेश देण्याची प्रचलीत पध्दती आहे. परंतू या प्रकरणात असे दिसून आलेले नाही.

4) करारनाम्यातील क्र. 28 च्या अटी व शर्तीचे पालन निविदाकाराने बऱ्याचशा प्रकरणात केलेले नाही व याबाबत कार्यालयाकडून याची दखल घेतली नाही असे चौकशी अंती आढळून आले.

5) संपूर्ण सॉफ्टवेअर अद्याप पर्यत विकसित झालेले नाही. त्यामुळे जो उद्देश प्रशासनाने ठेवला होता तो साध्य झाला नाही. कारण संपूर्ण अहवाल सॉफ्टवेअर मार्फत प्राप्त झाल्यावर अधिकारी व कर्मचाऱ्यांस मनुष्यबळाचा वापर करुन पूर्णपणे तपासावा लागतो. जे रेखाचित्र तीस दिवसाचे आंत मंजूरी करुन देवू अशा प्रशासनाच्या दाव्यास छेद जातो आहे.

6) ऑटो डी.सी.आर. प्रणाली लागू करणे हा एक धोरणात्मक निर्णय होता. स्थायी समिती समोर या निविदा मंजूर करण्याची तत्कालीन आयुक्तांची शिफारस जरी स्थायी समितीने मंजूर केली असेल तरी सुध्दा कायद्याने ही बाब म.न.पा. सभागृहाच्या समोर प्रशासनाने ठेवावयास पाहिजे होती. तेव्हा प्रशासनाला स्थायी समितीने मंजूरी दिली म्हणून हा प्रस्ताव कार्यान्वित केला ही बाब समोर करणे नियमाला अनुसरुन होणार नाही.

7) महानगरपालिका वेगवेगळया कामाकरिता अनेक तांत्रिक सल्लागाराच्या नेमणूका करीत असते. परंतू या प्रकरणात एकाही तांत्रिक सल्लागाराचे मत जाणून घेण्याची प्रशासनाला गरज का वाटली नाही हे स्पष्ट होत नाही.

8) कोणतेही प्रशासनिक शुल्क लावत असतांना म.न.पा. सभागृहाची मंजूरी आवश्यक असते. परंतू या प्रकरणात अशी मंजूरी अद्यापही अप्राप्त आहे.

9) प्रचलित म.न.पा. कायदा व उपविधी यामध्ये ऑटो डी.सी.आर. पध्दतीने मंजूरी घेतली पाहिजे असे बंधन नाही असे असतांना सुध्दा जे नागरिक रेखाचित्र म.न.पा. अधिनियमा प्रमाणे रितसर नोटीस देवून महानगरपालिकेत अर्ज सादर करतात त्यांचे अर्ज स्विकृत केल्या जात नाही असे नागरिकांची तक्रार आहे व याबाबत कार्यालयाने सुध्दा आपले मत स्पष्ट केले असून असे अर्ज कार्यालय स्विकृत करीत नाही.हे म.न.पा. अधिनियमास अनुसरुन नाही.

10) बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया व नागपूरातील आर्कीटेक्ट असोसिएशन यांच्या प्रतिनिधीसोबत झालेल्या दि. 4/2/2010 च्या सभेत या प्रणालीबद्दल अनेक तक्रारी केल्या. निविदाकाराद्वारे जे सॉफ्टवेअर चालविण्यात येते ते ठराविक कंपनीच्या सॉफ्टवेअरमध्येच चलीत होते. परंतू इतर कंपनीचे सॉफ्टवेअर या प्रोग्राममध्ये चलीत होत नाही. त्यामुळे असे निर्दशनास येते विशेष कंपनीला हा व्यवसाय देणे महानगरपालिकेच्या किंवा नागरिकांच्या हितात नाही. जे रेखाचित्र रु. 150/– मध्ये चार प्रतित काढून मिळतात त्याची एक प्रत निविदाकार रु. 150/– देतो अशी तक्रार अर्किटेक्ट असोसिएशन यांनी केली. शहरातील सर्वच आर्किटेक्ट व इंजिनिअर्स यांच्याकडे प्रिंटर्स उपलब्ध आहे. नागरिकांकडून रेखाचित्र काढण्याच्या शुल्कामध्ये या सर्व गोष्टांचा समावेश असतो तरी सुध्दा अतिरिक्त बोजा हा शहरातील नागरिकांना वहन करावा लागत आहे.

11) जे.एन.एन.यु.आर.एम. च्या करारनाम्यात रिफार्मन्स करण्यामध्ये जरी या गोष्टीचा समावेश असला तरी या विभागाचे अत्याधुनिकरण करत असतांना नागरिकांकडून अधिकचा पैसा वसुल करुन तो पैसा महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर घालणारा

असावा. परंतू असे उत्पन्न मिळत असतांना शहरातील नागरिकांना त्याचा त्रास होवू नये याची दक्षता घेण्याचे काम या महानगरपालिकेचे आहे. परंतू रिफार्मन्सच्या नावाने महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर न घालता नागरिकांच्या सोईची उपेक्षा होत आहे याचे भान न ठेवता बाहेरील कंपनींना या उत्पन्नाचा फायदा अप्रत्यक्षरित्या आपण या प्रकरणात देतो आहे. या निष्कर्षाप्रत ही समिती आलेली आहे.

12) नागपूर महानगरपालिकेतील नगर रचना विभागातील एकही अधिकारी व कर्मचारी या ऑटो डी.सी.आर. प्रणालीचे प्रशिक्षण घेतलेले आढळून आलेले नाही. करारनाम्याच्या अटी व शर्ती क्र. 6 मध्ये निविदाकार अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना टप्प्याने–टप्प्याने फ्री ऑफ कॉस्ट प्रशिक्षण देईल असे नमूद आहे. परंतू या अटी व शर्तीचे उल्लंघन झालेले आहे असे निर्दशनास आले आहे.

13) करारनाम्याच्या अटी व शर्ती क्र. 7 मध्ये हार्डवेअर मशिन्स व इतर साहित्य लावण्यात येणार होते ते पूर्णपणे लावलेले नव्हते असे चौकशी समितीस आढळून आले.

14) कररमान्याच्या अट क्र. 28 मधील नमूद बाबींचे कार्यालयाकडून योग्य शहानिशा झालेली आढळून आलेली नाही. याबाबतीतचा निविदाकाराकडून मासिक अहवाल सुध्दा घेतलेला चौकशी समितीस आढळून आलेला नाही.

ऑटो डी.सी.आर. पध्दती महाराष्ट्रातील औरंगाबाद, पुणे आणि मुंबई महानगरपालिकेत राबविण्यात येत आहे. परंतू या सर्व महानगरपालिकेच्या पध्दती वेगवेगळे आहेत असे निर्दशनास आले.

**समितीच्या शिफारसी :–**

अ) मुंबई महानगरपालिका ज्या पध्दतीने ही ऑटो डी.सी.आर. पध्दती राबवित आहे. त्याच पध्दतीने नागपूर महानगरपालिकेने ही पध्दती राबवावी. नागपूर महानगरपालिकेतील नगर रचना विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देवून या पध्दतीची अंमलबजावणी करावी व रितसर महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन म.न.पा. चे स्वतःचे हार्डवेअर व सॉफ्टवेअर खरेदी करुन या पध्दतीची अंमलबजावणी करावी. यामध्ये महानगरपालिकेचे उत्पन्न वाढावे याची काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे.

ब) नागपूर महानगरपालिकेत सुरु असलेली ऑटो डी.सी.आर. पध्दतीस नागपूर महानगरपालिकेची मान्यता नसल्यामुळे व या प्रणालीत म.न.पा. सभागृहाचा धोरणात्मक निर्णय नसल्यामुळे तसेच वरील 1 ते 14 निष्कर्षामधील त्रृटयामुळे प्रचलित ऑटो डी.सी. आर. चे कंत्राट रद्द करण्याची ही उपसमिती स्थायी समितीला शिफारस करते.

हस्ता /– श्री नरेंद्र ऊर्फ बाल्या बोरकर ,अध्यक्ष
हस्ता /–श्री अशोक काटले ,सदस्य
हस्ता /–श्री विनोद वालदे, सदस्य
हस्ता/–श्री.अशोक मुळे ,सदस्य

<u>ठराव क्रमांक 53</u> :– म.न.पा. प्राथमिक शिक्षण विभागात एकूण 187 प्राथमिक शाळा कार्यरत असून यापैकी 36 शाळा भाडेतत्वावरती इमारत घेवून शाळेचे कामकाज सुरु आहे. उर्वरित सर्व शाळा म.न.पा. च्या मालकिच्या इमारती मध्ये भरविण्यात येतात. सदर इमारतीचे बांधकाम अनेक वर्षापुर्वी झालेले असल्याने, या इमारतीमध्ये मोठया प्रकारची दुरुस्ती किंवा किरकोळ दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता आहे.

म.न.पा. अंदाजपत्रकामध्ये शाळा इमारत दुरुस्ती पद क्र. 459 व 460 अंतर्गत किरकोळ दुरुस्तीचे अधिकार क्षेत्रिय कार्यालयास देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे पद क्र. 752 (नविन शाळा निर्माण) मध्ये एकूण 50 लक्ष प्राप्त तरतूदी मधून वेगवेगळया कामाकरिता प्रावधान देण्यात आलेले आहे व सद्यःस्थितीत तरतूद निरंक आहे.

तरी मागासवर्गीयांचे राखीव तरतूदी अंतर्गत पद क्र. 444 (शालेय विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप) व पद क्र. 445 (शालेय विद्यार्थ्यांना गणवेष) या दोन्ही पदा अंतर्गत तरतूदीची आवश्यकता नसल्याने या पदाअंतर्गत प्राप्त तरतूद अनुक्रमे 15 लक्ष व 25 लक्ष एकूण तरतूद 40 लक्ष पद क्रमांक 464 (प्राथ. शाळा इमारत दुरुस्ती) मध्ये वळती करावी. याप्रमाणे सदर पदा अंतर्गत उपलब्ध असलेली तरतूद रु. 30.00 लक्ष व वळती केलेली तरतूद रु. 40.00 लक्ष असे एकूण रु. 70 लक्ष तरतूद उपलब्ध राहील. करीता रु. 40.00 लक्ष तरतूद वळती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 54</u> :– नागपूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागात इयत्ता 1 ली ते 8 वी च्या एकूण 187 शाळा आहेत. या शाळेत सर्व प्रवर्गातील मुले–मुली शिक्षण घेत आहेत तथापी दारीद्र रेषेखालील व अनुसूचित जाती/जमाती मधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती शासनाच्या लाभ मिळणे आवश्यक आहे. म.न.पा. च्या शाळेतील हया विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्याकरिता शिक्षणासाठी मदत करण्याकरिता म.न.पा. ने 2011–2012 चे अंदाजपत्रकात पद क्र. 446 मध्ये रु. 6.00 लक्ष तरतूद शिष्यवृत्ती करिता केलेली आहे. ही तरतूद कमी पडत असल्याने मा. दुर्बल घटक समितीच्या दिनांक 29/6/2011 रोजी झालेल्या बैठकित पद क्र.31 (मागासवर्गीय उमेदवार मुलाखतीकरीता प्रवासखर्च) मधील रु. 3.00 लक्षची तरतूद पद क्र. 446 मधे वळती करण्याबाबत निर्देशित करण्यात आले असे केल्यास शिष्यवृत्ती पासून पात्र विद्यार्थी वंचित न राहता योग्य प्रमाणात शिष्यवृत्ती प्राप्त होईल. या अनुषंगाने पद क्रमांक 31 मधील प्राप्त तरतूद रु. 3.00 लक्ष पद क्र. 446 मधे वळती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 55</u> :– नागपूर महानगरपालिकेतर्फे नागपूर शहरात विविध ठिकाणी बांधण्यात येणाऱ्या सिमेंट कॉक्रीट रोड करीता कंत्राटदार मे. युनिटी ईन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांना साईट ऑफीस, लेबर कॅम्प, स्टोर करिता अस्थायी

स्वरुपात मौजा भामटी व मौजा वाठोडा येथील जागा नाममात्र दरावर मासिक भाडयाच्या 2 टक्के दराने जमीन वापर शुल्क आकारुन प्रस्तावित अटी व शर्तीवर उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मौजा भामटी येथील प्रस्तावित जागा वगळुन मौजा वाठोडा येथील जागेस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 56</u> :– केन्द्रशासनाद्वारे पुरस्कृत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनुरुत्थान अभियान अंतर्गत वाढीव पाणी पुरवठा पेंच टप्पा–4 योजना मंजूरी प्राप्त असून या प्रकल्पावर व्यवस्थापकीय नियंत्रण ठेवण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार यांची निविदेद्वारे नेमणूक करण्यात आली व व्यवस्थापकीय सल्लागाराचे कामे मेसर्स डी. आर.ए.–नागपूर व मेसर्स एस.टी.सी.–मुंबई(संयुक्त परिक्रम) यांना स्थायी समिती ठराव क्र. 100 दिनांक 30.07.2008 अन्वये एकूण रुपये 6,16,000,00.00 चे कार्यादेश देण्यात आले. पेंच टप्पा–4 वाढीव पाणी पुरवठा योजना मार्च 2012 पर्यत पूर्ण करणे प्रस्तावित आहे. व्यवस्थापकीय सल्लागाराना एकूण जून 2012 पर्यत मुदत वाढ देण्याकरिता एकूण रु. 1.94 कोटी अतिरिक्त प्रावधान, निविदा अटी नुसार प्रस्तावित आहे.

व्यवस्थापकीय सल्लागाराची जून 2012 पर्यत मुदत वाढ व या अवधीत रु. 1.94 कोटी चे अतिरिक्त भुगतान निविदा अटी व शर्तीनुसार करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयीन शिफारसीस समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

कामाचा खर्च CDF मधून प्रस्तावित आहे.

<u>ठराव क्रमांक 57</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर